# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक १२.०१.२०२६

**थाळनेर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार भुषण रामोळे, पोलीस कॉन्स्टेबल धनराज मालचे, किरण सोनवणे व मुकेश पावरा यांनी तक्रारदार यांच्याकडे ३,००,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २,००,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन सदर लाचेची रक्कम पोलीस कॉन्स्टेबल मुकेश पावरा यांचे हस्ते स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | धुळे |
| पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक | शिरपुर शहर पो. स्टे. गुरनं. /२०२६, जि. धुळे |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि. १२.०१.२०२६ |
| आरोपीचे नांव, वय व कार्यालय | ०१) मुकेश गिलदार पावरा, वय ३३ वर्ष, पो.कॉ. ब.नं.१५९३ रा. शिवप्रसाद नगर, प्लॉट नं. ३१, मातृपितृ छाया, करवंद शिवार, शिरपुर, जि. धुळे<br>०२) भुषण यशुपाल रामोळे, पोलीस हवालदार, ब.नं. ०७<br>०३) धनराज बबन मालचे, पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं. १४५८<br>०४) किरण सखाराम सोनवणे, पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं. १६९६<br>सर्व नेमणुक थाळनेर पोलीस स्टेशन |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २,००,०००/— रुपये तडजोडीअंती |
| थोडक्यात हकिगत :— | तक्रारदार हे मौजे महादेव दोंदवाडा, नागेश्वर पाडा, ता. शिरपुर, जि. धुळे येथील रहिवासी असुन त्यांचे वडीलांविरुध्द दि.१८.१०.२०२३ रोजी थाळनेर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १५७/२०२३ अंमलीपदार्थ विरोधी अधिनियमान्वये गुन्हा दाखल आहे. थाळनेर पोलीस स्टेशनचे पो. हवा. भुषण रामोळे, पो.कॉ. धनराज मालचे, किरण सोनवणे व मुकेश पावरा यांनी तक्रारदार यांच्या वडीलांना गुन्हयात अटक न करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे ३,००,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी दुरध्वनीव्दारे माहिती दिली होती.<br>सदर माहितीवरुन धुळे ला.प्र. विभागाच्या पथकाने दि.०८.०१.२०२६ रोजी बभळाज, ता. शिरपुर येथे जावुन तक्रारदार यांची तक्रार नोंदवुन घेतली. सदर तक्रारीवरुन पडताळणी केली असता पो. हवा. भुषण रामोळे, पो.कॉ. धनराज मालचे, किरण सोनवणे व मुकेश पावरा यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचांसमक्ष तडजोडीअंती २,००,०००/— रुपये लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले होते. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान पो.कॉ. मुकेश पावरा यांनी तक्रारदार याच्याकडुन २,००,०००/— रुपये लाचेची रक्कम स्वतः स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |
| सापळा अधिकारी | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, |
| सापळा पथक | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, प्रशांत बागुल, पोकॉ. सागर शिर्के, पोकॉ. प्रितेश चौधरी, मपोकॉ. रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, पोकॉ. जगदीश बडगुजर |
| तपास अधिकारी | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| मार्गदर्शन | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/निम शासकिय अधिकारी/कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"**

**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री क्रमांक** :— १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :— ०२५६२—२३४०२०
**व्हॉटस ॲप क्रमांक** :— ७७९८१६१०६४